**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **गांधीनगर, आंबेडकरनगर भाईंदर (प.) भागातील सामूदायिक/सार्वजनिक स्वच्छतागृहाची तात्काळ दूरूस्ती**

मिरा भाईंदरच्या गांधीनगर, आंबेडकरनगर भाईंदर (प.) भागातील सामूदायिक/सार्वजनिक शौचालयाचे दरवाजे नसल्याने दूरवस्था झाल्याबाबतचे वृत्त दि. 17.04.2025 रोजीच्या दै. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. यावर घनकचरा व्यव्यस्थापन विभागामार्फत तातडीने कारवाई करण्यात आली आहे. या परिसरातील सामूदायिक/सार्वजनिक शौचालयाच्या सव्च्छता व देखभालीची जबाबदारी ज्या ठेकेदारास देण्यात आली आहे त्या ठेकेदारास संबंधित विभागामार्फत नोटीस बजावण्यात आली आहे.

या नोटीसमध्ये ठेकेदारास सामूदायिक / सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन साफसफाई व दूरूस्ती करून घेण्यात यावे तसेच दैनंदिन साफसफाई कामाचा दर्जा वाढविण्यात यावा असे नमूद करण्यात आले आहे. संबंधित ठेकेदाराकडून दिलेल्या कामात कसूराई आढळून आल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल असे बजाविण्यात आले आहे. त्याप्रमाणे संबंधित ठेकेदाराने सदरच्या नोटीसीचे दखल घेत सुधारणात्मक कृती केली असून नवीन दरवाजे तात्काळ बसविण्यात आले आहेत.

शहरातील नागरिकांना प्राथमिक सोई-सुविधा पूरविण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन कटीबद्ध असून या सेवा पूरविण्यात कसूर करणा-यांवर उचित कारवाई करण्यात येईल. असे मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी सांगितले.